दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३१४
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२५ जून २०२५

"ज्या दिवशी आपले विचार मोठे होतील, त्या दिवशी मोठे मोठे लोक आपला विचार सुरू करतील.."

## राहुल गांधींचा थेट मुख्यमंत्र्यांच्या मतदारसंघात फेरफारीचा आरोप



**अक्षराज : वृत्तसंकलन**
**दि.२४, नागपूर :** महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत भाजपच्या विजयावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभं केलं आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपूर दक्षिण पश्चिम मतदारसंघात मोठ्या प्रमाणात फेरफार झाल्याचा आरोप केला आहे. मंगळवारी आपल्या अधिकृत एक्स (ट्विटर) अकाउंटवर पोस्ट करत राहुल गांधी यांनी दावा केला की, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या नागपूर दक्षिण-पश्चिम मतदारसंघात अवघ्या पाच महिन्यांत मतदारसंख्येत तब्बल ८ टक्क्यांची वाढ झाली आहे. काही मतदान केंद्रांवर ही वाढ २० ते ५० टक्क्यांपर्यंत असल्याचेही त्यांनी नमूद केले.

राहुल गांधी म्हणाले की, 'या मतदारसंघात अनेक अज्ञात व्यक्तींना बीएलओंनी (बूथ लेव्हल ऑफिसर) रजिस्टर करून मतदान करण्याची संधी दिली. यामध्ये अनेक मतदारांचे पत्तेही पडताळता आलेले नाहीत, अशी माहिती माध्यमांनी दिली आहे.' त्यांनी याआधीही एका पोस्टद्वारे आरोप केला होता की, महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मोठ्या प्रमाणावर फेरफार झाली असून, 'ही निवडणूक एक प्रकारची मॅच फिक्सिंग होती' असे त्यांचे मत होते. आता त्यांनी पुन्हा एकदा भाजपच्या विजयावर शंका उपस्थित करत, निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

राहुल गांधी यांच्या म्हणण्यानुसार, ही घटना केवळ अपवाद नाही, तर ती स्पष्टपणे 'वोट चोरी' (मतांची चोरी) आहे. त्यांनी असा आरोपही केला की, 'या प्रकरणावर निवडणूक आयोगाने अद्याप मौन बाळगले आहे, जे त्यांच्या संभाव्य संगनमताचा इशारा करते.' त्यामुळे राहुल गांधी यांनी मशीन-रिडिंग डिजिटल मतदार यादी आणि मतदान केंद्रांवरील सीसीटीव्ही फुटेज तत्काळ जाहीर करण्याची मागणी केली आहे.

या आरोपांमुळे राज्यातील राजकारणात खळबळ उडाली आहे. काँग्रेसने याआधीही निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेवर अनेकदा प्रश्न उपस्थित केले आहेत. परंतु आता थेट मुख्यमंत्री यांच्या मतदारसंघातच असा मोठा आरोप झाल्यामुळे या प्रकरणाकडे राजकीय आणि सामाजिक स्तरावर गांभीर्याने पाहिले जाण्याची शक्यता आहे. तर राजकारण तापणार असल्याचेही संकेत आहेत.

## कल्याण डोंबिवलीकारांचा रिक्षा प्रवास महागला...



**अक्षराज : संजय पंडित**
**दि.२४, कल्याण (ठाणे) :** कल्याण आरटीओ क्षेत्रात शेअर रिक्षासाठी भाडेवाढ लागू झाली आहे. त्याचबरोबर मिटरवर चालणाऱ्या रिक्षांची देखील ही भाडेवाढ करण्यात आली आहे. त्यामुळे कल्याण आणी डोंबिवलीकरांच्या खिशाला आता चाट लागणार आहे. नव्या भाडेवाढी नुसार मीटरने चालणाऱ्या रिक्षांच्या भाड्यात ३ रुपये वाढ झाली आहे. तर शेअर भाड्यात ३ ते ५ रुपयांनी वाढ झालेली आहे. कल्याण आरटीओ क्षेत्रात अनेक ठिकाणी शेअर रिक्षा धावतात. त्यातून प्रवास करणाऱ्यांची संख्या ही मोठी आहे. महापालिकेच्या पब्लिक ट्रान्सपोर्ट पेक्षा शेअर रिक्षाकडे कल्याण,डोंबिवली, उल्हासनगर तथा अंबरनाथ मधील नागरिकांचा अधिक कल आहे.

रिक्षाची भाडे वाढ ही चार महिन्या पूर्वीच सरकारने दिली होती. पुर्वी रिक्षाचे कमीत कमी मीटर भाडे २३ रुपये होते. त्यात आता तीन रुपये वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे जर जवळच्या जवळ जरी मिटरने जायचे असेल तर २६ रुपये खर्च करावे लागणार आहेत. प्रवाशांवर अचानक बोजा पडू नये म्हणून ही भाडेवाढ चार महिन्या आधी लागू केलेली नव्हती, असं यावेळी रिक्षा टॅक्सी चालक मालक संघटनेचे उपाध्यक्ष संतोष नवले यांनी स्पष्ट केलं होतं. तसेच रिक्षा मीटरचे काही तात्रीक गोष्टी करायच्या होत्या.

आता त्याचे ९५ टक्के काम झाले आहे असं ही नवले यावेळी म्हणाले. वाहतूक शाखेकडून ओवर सीटवर कारवाई सुरु केली आहे. जास्त सिट घेतल्या तर दहा हजार रुपयांचा दंड वसूल केला जात आहे. हे अन्यायकारक आहे असं ही ते म्हणाले. याबाबत सरकारकडे दाद मागणार असल्याचं त्यांनी सांगितले. सध्या जी भाडेवाढ झाली आहे ती प्रत्येक रूटवर म्हणजेच कल्याण आर टी ओ क्षेत्रातील कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर आणी अंबरनाथ आदी शहरांत झाली असल्याचं ही त्यांनी स्पष्ट केलं.

दरम्यान कल्याण शहर आणी कल्याण आरटीओ हद्दीत जरी ही भाडेवाढ झाली असली तरी,

विशेष बाब म्हणजे कल्याण डोंबिवली परिसरात मीटर प्रमाणे भाडे आकारले जातच नाही. म्हणुनच परिसरात या मीटर भावाढीचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

या भाव वाढीनुसार शेअर रिक्षात तीन ते चार रुपये भाडे वाढ करण्यात आलेली आहे.महागाई ही प्रत्येकालाच आहे. त्यानुसार रिक्षा चालकांनाही महागाई आहे. सध्या बाजारात प्रत्येक गोष्टीचे दर वाढले आहे. त्यामुळे ही भाडेवाढ गरजेची होती. या सर्व गोष्टींचा विचार करून सरकारने ही भाडेवाढ दिलेली आहे. प्रवाशांनी देखील ही बाब समजून घेतली पाहीजे. त्यांनी ही आता ही सर्व साधारण भाडेवाढ मान्य केली पाहीजे. वाढीव भाडे कोणताही वाद न घातला प्रवाशांनी द्यावे असे आवाहन ही त्यांनी या वेळी केले.

## संत गजानन महाराज दिंडीतील वारकऱ्यांची बोरिसावरगाव येथे आरोग्य तपासणी



**अक्षराज : शिवाजी औसेकर**
**दि.२४, केज :** शेगाव येथून आषाढी वारी निमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या संत गजानन महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील १७७ वारकऱ्यांची बोरीसावरगाव येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ अशोक गवळी यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाच्या पथकाने आरोग्य तपासणी करुन त्यांचेवर मोफत उपचार करुन त्यांना औषध, गोळ्यांचे वितरण केले. केज तालुका आरोग्य विभागाकडून आयोजित करण्यात आलेल्या यां तपासणी शिबिरात एकूण १७७ वारकऱ्यांच्या रक्तातील साखरेची पातळी, ब्लड प्रेशर, वजन चेक करून त्यावर योग्य तो औषधोपचार करण्यात आला. यावेळी दिंडी प्रमुखांना आरोग्य किट व वारकऱ्यांची तपासणी करुन त्यांना अषधोपचार करण्यात आले. दिंडी मार्गावर आरोग्यविषयक जनजागृती फलक लावण्यात आले होते.

आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. अशोक गवळी, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर मोमीन, समुदाय अधिकारी डॉ. कावळे, आरोग्य सहाय्यक कैलास वैद्य, शिंदे यांच्यासह आरोग्य सेवकांनी परिश्रम घेतले.

**हॉटेल कामगारांचीही तपासणी...**

बोरिसावरगाव सह परिसरातील सर्व हॉटेल व ढाबे येथे काम करणाऱ्या कामगारांचीही यावेळी तपासणी करण्यात आली. व साथीचे आजार रोखण्यासाठी हॉटेल व ढाब्याला पाणी पुरवठा करणाऱ्या बोअर, व विहिरीच्या पाण्याचे नमुनेही तपासण्यात आल्याची माहिती तालुका आरोग्य अधिकारी डॉ अशोक गवळी यांनी पुण्यनगरी शी बोलताना दिली.

## विंचूरला दुकानादाराचे दुकाना पुढे वस्तूचे अतिक्रमण; गुन्हा दाखल..




**अक्षराज : सुनील क्षिरसागर**
**दि.२४, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील रहदारी असलेल्या रस्त्यावर होणाऱ्या अतिक्रमण बाबत वेळोवेळी लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने पथक काढून कडक सूचना देण्यात आल्या परंतु मारवाडी पेठ, तसेच बाजार गल्ली, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यालयालगत रोड, ग्रामपालिके जवळ व श्रीराम चौक या रस्त्यावरील मोटरसायकलचे व चारचाकी च्या अतिक्रमणात कायम वाढतच आहे.

आज दि.२४ रोजी सकाळी ११ वाजेच्या सुमारास मारवाडी पेठ येथील भोलेहर जनरल स्टोअरचे दुकानासमोर, रस्त्यावर जनरल स्टोअरच्या दुकानाबाहेर रहदारीस अडथळा होईल अशा पद्धतीने अडकवलेल्या स्कूल बॅग व रस्त्यावर ठेवलेले दुकानातील विक्रीचे साहित्य लासलगाव पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांनी दुकानात घेण्यास सांगितले असता,

आरोपी १) शंकरलाल मिस्त्रीलाल सोनी, २) दिलीप मिस्त्रीलाल सोनी, ३) भाग्येश दिलीप सोनी, ४) जयेश बाबुलाल सोनी यांनी संगणमत करून सार्वजनिक ठिकाणी मोठमोठ्याने आरडा ओरडा करून पोलीस पथकावर अवाश्च भाषेचा वापर करून लोकांची गर्दी जमवून दुकानाबाहेर रहदारीचा अडथळा होईल अशा पद्धतीने अडकवलेल्या स्कूल बॅगा काढून घेण्यास नकार देऊन, पोलिसांचे कायदेशीर आदेशाचे पालन करण्या स्पष्टपणे नकार देऊन अवज्ञा केली. म्हणून लासलगाव पोलीस ठाणे येथे गुरनं- १५७/२०२५ भा.न्या.सं. कलम २२१, २२३, २८५ सह मु. पो.का. कलम १०२, ११२, ११७ प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास सहा. पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार कांदळकर करीत आहे.

## थोडक्यात

### अहिल्यानगर जिल्ह्यातील सरकारी वाळूच्या लिलावास ठेकेदारांचा ठेंगा



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२४, अहिल्यानगर :** राज्य सरकारने सुधारित वाळूधोरण जाहीर केल्यानंतर जिल्हा प्रशासनाच्या वतीने अहिल्यानगर जिल्ह्यातील १२ वाळू साठ्यांचे (रेती डेपोचे) ऑनलाइन पद्धतीने लिलाव करण्यासाठी वेळापत्रक जाहीर करण्यात आले. मात्र, या लिलावाकडे वाळू ठेकेदारांनी पाठ केल्याने तिनदा ताराखा जाहीर केल्यानंतर देखील सरकारी १२ वाळू साठ्यांसाठी ठेकेदार मिळू शकला नाही. यामुळे हतबल झालेल्या जिल्हा गौणखनिज विभागाने आता पावसाळा संपल्यानंतर निर्णय घेण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारच्या धडसोड वृत्तीमुळे गेल्या वर्षभरापासून नगर जिल्ह्यात वाळू डेपाचे लिलाव होऊ शकले नव्हते. त्यातच राज्यात महायुती सरकार अस्तित्वात आल्यानंतर नव्याने महसूल मंत्री पदाची सूत्रे हाती घेतलेल्या चंद्रशेखर बावनकुळे यांनी सुधारित वाळू धोरण जाहीर केले. राज्य पातळीवरून वाळू धोरण निश्चित झाल्यानंतर जिल्ह्यात पहिल्यांदा ९ जूनला सरकारी वाळू साठ्यांचा ऑनलाईन पद्धतीने लिलाव होणार होता.

यासाठी जिल्हाधिकार्यांच्या मान्यतेने वेळापत्रक तयार करण्यात आले. मात्र, पहिल्या लिलावाच्या वेळी एकही ठेकेदार वाळू लिलावासाठी ऑनलाईन अथवा ऑफलाईन पध्दतीने सहभागी होवू शकला नाही. त्यानंतर गौण खनिज विभागाने दोनदा लिलाव आयोजित केला. मात्र, त्यास प्रतिसाद मिळाला नाही. यामुळे आता पावसाळा संपल्यावरच याबाबत निर्णय घेण्यात येणार असल्याचे जिल्हा गौण खनिज विभागाच्या वतीने सांगण्यात आले.

**येथील रखडले लिलाव...**

कर्जत प्रांत कार्यालयातंर्गत कर्जत तालुक्यातील नागलवाडी, श्रीगोंदा-पारनेर प्रांत कार्यालयातंर्गत पारनेर तालुक्यातील तास (दोन ठिकाणी), पळशी, नागापूरवाडी, मांडवे खुर्द., पळशी, देसवडे गावच्या हद्दीत क्रमांक १ ते ४ या ठिकाणी तर श्रीरामपूर प्रांताधिकारी यांच्या अंतर्गत राहुरी तालुक्यातील जातप क्रमांक २ आणि देसवंडी अशा १२ ठिकाणी सरकारी वाळू साठ्याच्या लिलावास ठेकेदारांनी ठेंगा दाखवला आहे.

### तिखोल, बहिरोबावाडी, पारनेर रस्त्याची लागली वाट



**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्याच्या उत्तर भागातील नगर-कल्याण राष्ट्रीय महामार्गापासून तिखोल, बहिरोबावाडी, कीन्ही, करंडी मार्गे पारनेर शहराकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण स्वातंत्र्यानंतर प्रथमच एक वर्षापूर्वी पूर्ण झाले. मात्र, अवघ्या एका वर्षात हा रस्ता ठिकठिकाणी खराब झाला असून, खड्ड्यांनी चाळण झाली आहे.

निकृष्ट दर्जाच्या कामामुळे तिखोल येथील ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत ठेकेदाराला दोषी ठरवले आहे. रस्त्यावर सूचनाफलक नसणे, पुलांना कठडे नसणे यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. यामुळे ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत नवीन डांबरीकरणाचा लेयर न टाकल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. या रस्त्याच्या कामात ठेकेदाराने अत्यंत खालच्या दर्जाची सामग्री वापरल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

यावेळी माजी सभापती अरुणराव ठाणगे सरपंच भाऊसाहेब ठाणगे, माजी सरपंच रावसाहेब टिकल, इंजि. संकेत ठाणगे, माजी चेअरमन नागचंद ठाणगे, माजी उपसरपंच सोनू मंचरे, ग्रामपंचायत सदस्य दत्तात्रय ठाणगे, संभाजी ठाणगे, निस्सार तांबोळी, पांडुरंग तांबडे, महेश ठाणगे, गोरख ठाणगे, किरण ठाणगे, अशोक ठाणगे, शिवाजी ठाणगे, रेवन कावरे यांनी ठेकेदाराच्या निष्काळजीपणाचा निषेध केला. रस्त्याची तातडीने दुरुस्ती न झाल्यास तीव्र आंदोलन करू, असा इशारा त्यांनी दिला.हा रस्ता तालुक्याच्या ग्रामीण भागाला जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, खराब रस्त्यामुळे प्रवास जिकिरीचा झाला आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तक्रारी केल्या असून, लवकरच कारवाईची मागणी केली आहे. प्रशासन आणि ठेकेदार यांच्याकडून यावर काय उपाययोजना होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### आपधुप येथे विविध विकासकामांचा भुमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**
**दि.२४, पारनेर (अहिल्यानगर) :** अहिल्यानगर जिल्ह्याचे माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील हे आज मंगळवारी पारनेर तालुका दौऱ्यावर होते. त्यांनी पारनेर तालुक्यातील आपधुप येथे विविध विकासकामांचे भुमिपूजन व उद्घाटन समारंभ मा. खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांच्या शुभहस्ते व आमदार काशिनाथ दाते यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

यावेळी जिल्हा बँक संचालक प्रशांत गायकवाड,भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य विश्वनाथ कोरडे,माजी नगराध्यक्ष विजुभाऊ औटी,राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, भाजपा तालुका अध्यक्ष राहुल शिंदे, जनसेवा फौंडेशनचे अध्यक्ष सचिन पाटील वराळ, दुध संघाचे अध्यक्ष दत्तानाना पवार,भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष दुधाडे, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष सुनिल थोरात, युवा मोर्चा सरचिटणीस सागर मैड,भाजपा महिला जिल्हा अध्यक्षा अश्विनी थोरात,राष्ट्रवादी तालुका महिलाध्यक्षा सुषमा रावडे, आदिंसह स्थानिक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## अमेरिकेचे कुटील धोरण

सध्या अमेरिकेला पाकिस्तान प्रेमाचा भलताच उमाळा आहे. पाकिस्तान हा दहशतवाद पसरवणारा जगातील पहिल्या क्रमांकाचा देश असून पाकिस्तान हीच दहशतवादाची फॅक्टरी आहे हे माहीत असूनही अमेरिका पाकिस्तानसाठी पायघड्या घालत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे तर पाकिस्तान प्रेम उतू चालले आहे. पाकिस्तान आपल्यासाठी खास देश आहे असे वक्तव्य त्यांनी नुकतेच केले आहे इतकेच नाही तर पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल मुनीर यांनी यांना त्यांनी व्हाइट हाऊसमध्ये खास निमंत्रण देऊन त्यांच्यासोबत जेवण करत त्यांची सरबराई केली. अमेरिकेच्या इतिहासात पहिल्यांदाच अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी एखाद्या देशाच्या लष्करप्रमुखाला बोलावून त्याचा इतका मोठा सन्मान केला आहे. व्हाइट हाऊसमध्ये देशाचे प्रतिनिधी म्हणून देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान किंवा मंत्र्यांना निमंत्रित केले जाते. पाकिस्तानचे जनरल जिया - उल - हक, जनरल आयुब खान आणि जनरल परवेज मुशर्रफ यांना व्हाईट हाऊसने निमंत्रण दिले होते पण ते पाकिस्तानचे लष्करप्रमुख म्हणून नव्हे तर पाकिस्तानचे राष्ट्रपती म्हणून. व्हाईट हाऊसमध्ये झालेल्या या भेटीत या दोघांत विविध विषयांवर चर्चा झाली. या चर्चे नंतर ट्रम्प यांनी भारत पाकिस्तान युद्ध आपणच थांबवल्याचा पुनरुच्चार केला. पाकिस्तानचे लष्करप्रमुख जनरल आसिफ मुनीर यांनी भारत पाकिस्तान युद्ध थांबवल्याबद्दल ट्रम्प यांचे आभार मानून भारत पाकिस्तान युद्ध थांबल्याबद्दल ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार देण्याची मागणी केली. हे सर्व अचंबित करणारे आहे. ज्या पाकिस्तानमुळे जगात दहशतवाद पसरत आहे त्याच पाकिस्तानच्या लष्करप्रमुखाला ट्रम्प बोलावतात त्यांच्यासोबत जेवण करतात. हा ट्रम्प यांचा दुटप्पीपणाच आहे. दहशतवादा विरोधातील लढाईत अमेरिकेचे धोरण किती संधीसाधू आणि स्वार्थी आहे हेच यातून दिसून येते. जनरल आसिफ मुनीर यांना भेटून ट्रम्प काय साध्य करू इच्छितात? ज्या पाकिस्तानला भारत क्रमांक एकचा शत्रू मानतो त्या पाकिस्तानला जवळ करण्यामागे ट्रम्प यांचा उद्देश काय ? असा प्रश्न विचारला जात आहे. त्याचे उत्तर इराण इस्राईल यांच्यात सुरू असलेल्या युद्धात मिळेल. मागील आठवड्यात इस्राईलने इराणच्या आण्विक केंद्रावर हल्ला केला. याला प्रतिउत्तर म्हणून इराणनेही इस्राईलवर मोठा हल्ला केला. या हल्ल्यात दोन्ही देशांचे शेकडो नागरिक आणि सैनिक मरण पावले. हा संघर्ष अजूनही चालू आहे. या युद्धाआधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणचे सर्वोच्च नेते आयातुला खोमेनी यांना अमेरिकेशी आण्विक करार करण्याची गळ घातली मात्र खोमेनी यांनी ती स्पष्टपणे नाकारली. जर तुम्ही आमचे ऐकणार नसाल तर तुम्हाला त्याची किंमत मोजावी लागेल अशी धमकीच ट्रम्प यांनी तेंव्हा खोमेनी यांना दिली होती. त्यानंतर काही दिवसातच इस्राईलने इराणवर हल्ला केला याचाच अर्थ अमेरिकेच्या चिथावणीवरूनच इस्राईलने हा हल्ला केला. एकीकडे भारत पाकिस्तान युद्ध मी थांबवले असा डंका पिटत स्वतःला नोबेल पुरस्कार देण्याची मागणी करायची दुसरीकडे इस्राईल आणि इराणमध्ये युद्ध पेटवून द्यायचे. ट्रम्प यांचा हा कुटील डाव आता जगाच्या समोर आला आहे. इस्राईलने इराणवर हल्ला करूनही इराण आपले ऐकत नाही हे लक्षात आल्यावर ट्रम्प यांनी या युद्धात इस्रायलच्या बाजूने उतरण्याची धमकी दिली. या धमकीलाही इराणने जुमानले नाही त्यामुळे ट्रम्प तात्यांचा तिळपापड झाला आणि अखेर रविवारी अमेरिकेने या युद्धात प्रत्यक्ष भाग घेत इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला केला. या हल्ल्यानंतर संपूर्ण जगभर खळबळ माजली असून अमेरिकेने या युद्धात प्रवेश करणे ही तिसऱ्या युद्धाची नांदी ठरू शकते असे जाणकार म्हणत आहेत. कारण या हल्ल्यानंतर इराणला अनेक देशांनी पाठिंबा दिला असून अमेरिकेचा निषेध केला आहे. या हल्ल्यानंतर इराणने रशियाशी संधान बांधले असून रशियाने इराणला पाठिंबा दिला आहे. अमेरिकेने पुन्हा इराणवर हल्ला केला तर रशिया इराणच्या बाजूने युद्धात उतरेल असे आश्वासन इराणला रशियाने दिले आहे. जर रशिया या युद्धात उतरलाच तर तिसऱ्या महायुद्धाला तोंड फुटेल. अशा अवस्थेत अमेरिकेला आशिया खंडात स्वतःचा हक्काचा लष्करी तळ हवा आहे आणि पाकिस्तान हा त्यासाठी सर्वात सोईस्कर आणि योग्य देश आहे अशी त्यांची धारणा आहे. भविष्यात इराण आणि रशिया विरुद्ध लढ्यासाठी पाकिस्तानची भूमी वापरता यावी यासाठीच ट्रम्प यांची ही खेळी आहे. पाकिस्तानला चुचकारण्यामागे ट्रम्प यांचा हाच उद्देश आहे. अर्थात पाकिस्तानच्या हे लक्षात न येण्याइतका पाकिस्तान दुधखुळा नाही. पाकिस्तानला हे माहीत असूनही पाकिस्तान ट्रम्प यांच्या जाळ्यात अडकतोय कारण त्यात त्यांचाही स्वार्थ आहे. भविष्यात जर भारताने ऑपरेशन सिंदूर सारखी कारवाई केली तर अमेरिकेने पाकिस्तानची बाजू घ्यावी असे त्यांना वाटते म्हणजेच या भेटीमागे अमेरिका आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा स्वार्थ आहे. स्वतःच्या स्वार्थासाठी हे दोन्ही देश जगाला युद्धाच्या खाईत लोटत आहेत म्हणूनच या दोन्ही स्वार्थी देशांविरुद्ध जगाने एक होण्याची गरज आहे.

# प्रसिद्धी आणि गुढतेचे वलय मृत्यूनंतरही कायम!

मायकल जॅक्सन हे एक जगप्रसिद्ध अमेरिकन पॉप गायक, गीतकार आणि नर्तक. किंग ऑफ पॉप याबरोबरच द ग्लोव्ह वन, वॉको जॅको, एम जे, जॅको, मिकी माईक, ऍपलहेड, स्मिली अशा अनेक टोपणनावानेही ते प्रसिद्ध होते. त्यांचा जन्म अमेरिकेतील शिकागोजवळील इंडियाना येथील गॅरी या गावात झाला. जॅक्सन स्ट्रीटवर एका श्रमिक वर्गातील आफ्रिकन-अमेरिकन कुटुंबामध्ये जन्मलेले मायकल हे जॅक्सन कुटुंबातील दहा मुलांपैकी आठवे मुलगे होते. त्यांना रेबी, लातोया आणि जेनेट या तीन बहिणी आणि जॅकी, टीटो, जर्माइन, मार्लन आणि रँडी हे पाच भाऊ. त्यांची आई कॅथरीन एस्तेर जॅक्सन या क्लॅरिनेट आणि पियानो वाजवत असत. त्यांचे वडील जोसेफ हे निवृत्त मुष्टियोद्धा होते. चरितार्थाकरिता ते क्रेन ऑपरेटरचे काम करीत. तसेच स्थानिक रिदम अँड ब्लूज बँडमध्ये गिटार वाजवित असत. जोसेफ आणि त्यांचे भाऊ ल्यूथर यांनी इतर सहकाऱ्यांसमवेत द फॅल्कन्स नावाचा बँड काढला. काही कालावधीनंतर तो बंद पडला; पण त्यांच्या गाण्याच्या तालमींमुळे या मुलांच्या मनात गायन, वादन यांबद्दल आकर्षण निमर्ण झाले व त्यांचे संगीताचे उपजत कलागुण हळूहळू वाढीस लागले. त्यांच्या आईवडिलांनी त्यांना घरीच संगीताचे शिक्षण द्यायला सुरुवात केली. त्यांच्या वडिलांनी या भावंडांना गायन, नृत्य, प्रत्यक्ष रंगमंचावर कसे वावरावे, सादरीकरण कसे करावे यांचे प्रशिक्षण दिले; पण याचबरोबर या सर्व भावंडांचे बालपण त्यांच्या वडिलांच्या विक्षिप्त स्वभावामुळे अतिशय खडतर परिस्थितीतही गेले. यामुळे बहुतांशी मुलांचा स्वभाव विशेषत: मायकल यांचा स्वभाव काही प्रमणात मनस्वी बनला.

दि.२९ ऑगस्ट १९५८ रोजी शिकागो नजीक एका लहानश्या गावात मायकल जैक्सनचा



– संकलन व सुलेखन –
कृष्णकुमार निकोडे गुरूजी
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप– ९४२३७१४८८३.

जन्म झाला. आफ्रिकन-अमेरिकन कामगारवर्गाच्या कुटुंबात जन्मलेला तो जोसेफ वॉल्टर- जो जॅक्सन आणि कॅथरीन एथर स्क्रूज यांचा दहा मुलांपैकी आठवा होता. त्यांचे वडील स्टील गिरणी कामगार म्हणून काम करत असत, त्याची आई एक प्रामाणिक यहोवाची साक्षीदार होती.

केथरीन या मायकलच्या आईला संगीताची फार आवड होती, मायकलला संगीताच्या आवडीचे बाळकडू हे घरातूनच मिळत गेले. अगदी लहानपणापासूनच ते संगीतप्रेमी होते. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली मायकल आणि त्यांची चार भावंडे मिळून जॅक्सन ब्रदर्स या नावाने संगीताचे कार्यक्रम करीत होती. त्यावेळी मायकल १० वर्षांचे होते. तत्कालीन तरुणांना आकर्षक वाटणारी दिलखेचक वेशभूषा आणि वेगळी केशभूषा- अफ्रोस- केसांची डोक्यावर गुच्छासारखी असणारी रचना, त्वेषाने आणि वेगवान हालचालींनी भरलेले नृत्य या वैशिष्ट्यांसह तरुण आणि उत्साही मंडळींनी भरलेला असा हा समूह अल्पावधीतच खूप यशस्वी झाला. पुढे त्यांच्या बँडचे नामकरण जॅक्सन-५ असे करण्यात आले. ऑगस्ट १९६७मध्ये हार्लेम येथील सुप्रसिद्ध अपोलो थिएटरमध्ये त्यांना कार्यक्रम करण्याची संधी मिळाली. तेथील अमॅच्युअर शो या कार्यक्रमात भाग घेण्यास मिळणे, ही कलाकारांसाठी एक पर्वणी असायची.

तेथील कार्यक्रमामुळे या बंधूंनाही प्रसिद्ध कलाकार म्हणून मान्यता मिळाली. स्टीलटाउन या संस्थेच्या नावाखाली पहिल्यांदा या बँडची बिग बॉय बॅक्ड विथ यू हॅव चेंज आणि वी डोन्ट हॅव टू बी ओव्हर २१ टू फॉल इन लव्ह, बॅक्ड विथ जॅम सेशन ही दोन गाणी ध्वनिमुद्रित झाली. यानंतर काही कालावधीतच अमेरिकेतील एक प्रसिद्ध ध्वनिमुद्रिका संस्था मोटाऊन रेकॉर्ड्स या संस्थेचे अध्यक्ष ज्युनिअर बेरी गॉर्डी यांनी या बँडबरोबर मोठ्या रकमेचा करार केला- १९६८. या संस्थेबरोबर जॅक्सन-५ यांनी आय वॉंट यू बॅक, एबीसी, द लव्ह यू सेव्ह, आय विल बी देअर, ममाज पर्ल, नेव्हर कॅन से गुडबाय, मेबी टुमॉरो या अत्यंत यशस्वी ध्वनिमुद्रिका केल्या. आय वॉंट यू बॅक हे या संस्थेबरोबरचे त्यांचे पहिलेच गाणे अतिशय लोकप्रिय झाले. अमेरिकेतील बिलबोर्ड्स टॉप १००- अमेरिकेतील सर्वांत लोकप्रिय ध्वनिमुद्रिका आणि गीतांची क्रमवारी प्रसिद्ध करणारे मान्यताप्राप्त साप्ताहिक या संगीत मानांकनात हे गाणे पहिल्या क्रमांकावर गेले. अमेरिकेत या गाण्याच्या संग्रहाच्या जवळपास वीस लक्ष आणि अमेरिकेबाहेर चार लक्ष प्रतींची तडाखेबंद विक्री झाली. पुढच्या एबीसी या संग्रहाच्या बावीस लक्ष प्रतींची विक्री झाली.

मायकल जॅक्सन त्यांच्या नवीन कार्यक्रमाच्या तयारीत असताना त्यांना जोरात हृदयविकाराचा झटका आला. वयाच्या ५० व्या वर्षी अमरिकेतील कॅलिफोर्निया येथे हृदयक्रिया बंद पडल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. अतिरिक्त औषधांच्या सेवनामुळेही त्यांना हृदयविकाराचा झटका आला असावा, असे निदान करण्यात आले होते. मायकल जॅक्सन यांच्या जीवनावर आधारित विविध चित्रपट आणि माहितीपट तयार करण्यात आले आहेत. यामध्ये द विझ-१९७८, मायकल जॅक्सन थ्रिलर-१९८३, मेकिंग ऑफ मायकल-१९८३, मायकल जॅक्सन द लिजेंट-१९८८, कॅप्टन इ ओ-१९८६, मायकल जॅक्सन वन नाईट-१९९५, मायकल जॅक्सन नंबर वन्स-२००३, मिस कास्ट अवे आणि द आयलँड गर्ल्स-२००४, द वन-२००४, मायकल जॅक्सन अनमास्क्ड-२००९, मायकल जॅक्सन दिस इज इट-२००९, मायकल जॅक्सन व्हिजन-२०१०, बॅड २५-२०१२, मायकल जॅक्सन द लास्ट फोटो शूट-२०१४ इत्यादींचा समावेश आहे.

जगाला विद्युत शॉक देणारा दिवस म्हणजे दि.२५ जून २००९ रोजी लॉस एंजेलिस येथे दुपारी २:२६ वा. अचानक दूरचित्र वाहिन्यांवर वृत्त झळकायला लागलं. मायकेल जॅक्सन यांचं निधन!.. अनेकांसाठी तो खूप मोठा धक्का होता. या धक्क्यानं अमेरिकेत अनेक लोक रस्त्यावरच बेशुद्ध पडले. काही मिनिटांतच सोशल मीडिया वेबसाईट्स क्रॅश झाल्या. नैराश्यात गेल्यानं १३ जणांनी आत्महत्या केली! सुसाईड प्रिव्हेन्शन हॉटलाइनवरही जगभरात शेकडो कॉल आले. हॉटलाइनवर असलेल्या तज्ज्ञांनी त्यांना कसंबसं आत्महत्येपासून परावृत्त केलं. त्यांच्याभोवती असलेलं प्रसिद्धीचं आणि गूढतेचं वलय त्याच्या मृत्यूनंतरही कायम होतं. ज्या दिवशी त्याचा मृत्यू झाला, तो दिवस तर त्याचे चाहते आजही विसरलेले नाहीत.

**!! या लेखप्रपंचातून पॉप गायक मायकेल जॅक्सन यांना स्मृतिदिनानिमित्त करोडो विनम्र अभिवादन !!**

# तेरमध्ये शेतकऱ्यांसाठी माहिती फलकाचे उद्धाटन...

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२४, धाराशिव :** गावातील शेतकरी व प्रसारमाध्यमे यांच्यातील दुरी कमी व्हावी व शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावी यासाठी आळणी महाविद्यालयातील कृषिदुतांच्या वतीने ग्राम पंचायत तेर येथील कार्यालयासमोर माहिती फलक उभारण्यात आला आहे. गावातील प्रमुख मान्यवरांच्या हस्ते या माहिती फलकाचे उद्धाटन करण्यात आले.



या कार्यक्रमास गावच्या सरपंच दीदी लोकेश काळे, उपसरपंच श्रीमंत रमेश फंड, कृषी सहाय्यक राम व्यंकट शिंदे , ग्रामसेवक बाबासाहेब खोचरे, उपक्रमाचे समन्वयक व्यवस्थापक हरि घाडगे, RAWE प्रमुख प्रा. देवानंद शेटे, प्राचार्य डॉ. क्रंतिकुमार पाटील, प्रा. अमित गांधले, प्रा. प्रताप खोसे उपस्थित होते.

याप्रसंगी कृषिदूत प्रणय कोकाटे, जगदिश बसाटे, रमन घोरपडे, अशोक यादव, अमोल मायकर, साहिल सांगुळे व संकेत सांगुळे यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत माहिती फलकाचे महत्त्व पटवून सांगितले. तर कृषिदुतांनी इथून पुढे शेतकऱ्यांच्या व शेतीशी निगडित बातम्या, लेख, छायाचित्रे व इतर बाबी माहिती फलकावर दर्शवल्या जातील असे सांगितले. यावेळी तेर येथील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### समिध्दी...

सर्वे सखोल करावा
दोस्तीकरण्याआधी
समोरच्याचेगुणदोष
तपासा निक्षून यादी

गठ बंधन हे सहेतूक
गोष्ट ही सरळ साधी
जरासा कमी जास्ती
फायदे नक्की साधी

गठबंधन मुळीठरेना
एकमेकां लावीनादी
एकचि ध्येय निश्चित
यंदा मिळवावी गादी

कैकदा पोळले हात
तरी ना आली शुध्दी
जमून जाईल गणिते
कुशाग्र ठेवता बुध्दी

आडवे ये कधी कधी
आपलेकरेअवरूध्दी
निर्णय हो निर्णायक
हेतुत हवी परिशुध्दी

परिस्थिती परिक्षेची
परिसराहोई समिध्दी
जोखीम जराशी घेता
नक्कीचं कार्य सिध्दी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# मिथक : वास्तव समजून घेण्याचा मानवी प्रयत्न

आपल्या आजूबाजूच्या गुंतागुंतीच्या जगाचे वास्तव समजून घेण्यासाठी आपण वापरत असलेले खरे मानीत असलेले सूत्र म्हणजे ' मिथक ' होय. आपल्या आजूबाजूला अनेक सजीव-निर्जीव वस्तू भौतिक स्वरूपात आहेत. त्यांना एक विशिष्ट संज्ञा आहे. त्यांची कल्पना आपल्याला त्यांच्या बाह्य रूपातून होते.परंतु आपल्या आजूबाजूला अशा काही संकल्पना, विचार, भावना असतात, ज्यांचे अर्थ लावताना आपण बऱ्याच वेळा गोंधळून जातो. उदाहरणार्थ, देव ही एक संकल्पना अशी आहे जिच्याबाबत एकमेका विरुद्ध दोन मिथके तयार होतात. आस्तिक आणि नास्तिक. आस्तिक माणूस श्रद्धा ठेवतो आणि देव आहे, असं मानतो. त्याच्या मते, देव हा सृष्टीचा निर्माता आहे. तो पाप-पुण्याचा हिशेब ठेवतो. तो दयाळू आहे. रक्षणकर्ता आहे. आणि भक्तीभावाने पूजा केल्यास तो प्रसन्न होतो. अशा आस्तिकांमध्ये श्रद्धा आणि अंधश्रद्धा या दोन उपमिथकांची पुनर्रचना होते.

याउलट, नास्तिक व्यक्ती देवाच्या अस्तित्वालाच नाकारते. हे नास्तिकत्व अस्तिकाच्या विरुद्ध मिथक ठरते. या मिथकांवर दोन्ही बाजूंनी १००% दावा लावला जातो.

एकत्र कुटुंब आणि विभक्त कुटुंब पद्धती हेदेखील अशाच प्रकारे गुंतागुंतीच्या संकल्पना आहेत. माणूस शेती करू लागल्यापासून अस्तित्वात आलेली एकत्र कुटुंब पद्धत औद्योगीकरणानंतर मोडकळीला आली. अनेकांच्या मते एकत्र कुटुंब आवश्यक आहे, कारण त्यात संस्कार, नातेसंबंध, सांस्कृतिक ठेवा, रीतिरिवाज यांची जपणूक होते. प्रेम, भावना, प्रगती आणि ऐक्याची भावना वृद्धिंगत होते.पण दुसऱ्या बाजूला काहींच्या मते, एकत्र कुटुंबात काही लोक आळशी, ऐतखाऊ, आणि उधळपट्टी करणारे असतात. त्यामुळे कष्टाळू लोकांना अधिक कष्ट करावे लागतात आणि त्यांचे शोषण होते. कधी कधी कुटुंबातीलच लोक प्रगती करणाऱ्याचे पंख कापतात. अशा प्रकारे कुटुंबपद्धतीबाबत दोन मिथके समोर येतात. जो जे मिथक स्वीकारतो, तो त्या पद्धतीने जीवन जगतो. काहीजण एकत्र कुटुंबातून बाहेर पडून हम दो, हमारे दो म्हणत स्वतंत्र न्यूक्लिअर फॅमिली तयार करतात. त्याच्याही पुढे जाऊन आता लिव्ह-इन रिलेशनशिपसारख्या संकल्पना मूळ धरत आहेत.या नवीन नातेसंबंधांवर आजच्या काळात सडकून टीका केली जाते. टीकाकारांच्या मते, अशा नात्यांतून अनेक गंभीर समस्या निमर्ण होतील – कुटुंबव्यवस्था उध्वस्त होईल, विवाहसंस्था मोडेल, स्त्री-पुरुषाचे नाते कृत्रिम, भोगवादी आणि तकलादू बनेल. तसेच, अशा नात्यांतून जन्मणाऱ्या अपत्यांच्या बाबतीतही अनेक प्रश्न उभे राहतील.

खरंतर, एका मिथकातून अनेक उपमिथके तयार होत जातात. त्या संकल्पनेचे समर्थन करणारे काही वेळा कट्टरवादी होतात. अशा अनेक मिथकांमुळे आपल्या आजूबाजूला गोंधळाचे वातावरण तयार होते. त्यातून खरे काय आणि खोटे काय, हे ठरवणे अनेकांना अशक्य होते.

याचप्रमाणे शहरीकरण आणि ग्राम व्यवस्था या दोन्ही संकल्पनांबाबतही विरोधी विचारधारा दिसून येते. खरंतर, नाण्याला दोन बाजू असतात त्याप्रमाणे प्रत्येक संकल्पनेला – म्हणजेच मिथकाला – दोन बाजू असतात. आपला दृष्टीकोन कसा आहे, यावरून आपल्याला त्या गोष्टीबाबतची संकल्पना तयार होते.उदाहरणार्थ, टोपी हा शब्द जर कोणी उच्चारला, तर अनेकांच्या मनात वेगवेगळे विचार येतात. काहींच्या मते टोपी म्हणजे पांढरी गांधी टोपी – सुसंस्कृतपणाचे प्रतीक. तर टोप्या घालणे हा शब्दप्रयोग कोणीतरी फसवणूक केल्याचे दर्शवतो.

समाजामध्ये अशा प्रकारच्या अनेक संकल्पना, मिथके आणि विचारसरणी तयार झालेल्या आहेत. जसे कावीळ झालेल्या व्यक्तीला सगळं जग पिवळे दिसते, त्याप्रमाणे मनातील भावना कशा आहेत, यावरून आपण एखाद्या गोष्टीबाबत विचार करू लागतो.

शेवटी, शुद्ध अंतःकरणाने, हेतूने आणि मनाने जर एखाद्या संकल्पनेबाबत विचार केला, तर त्या गोष्टीचे खरे सार समजते. म्हणूनच, खऱ्याचे पाठीराखे होण्याचा प्रयत्न जीवनात शक्य तितका करायला हवा.




**- किशोर जाधव, सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## झरी मुकूटबन क्षेत्रातील वीज पुरवठा वारंवार खंडित



**अक्षराज : राजू गागरे**

**दि.२४, झरी (यवतमाळ) :** झरी तालुक्यातील झरी, मुकूटबन, पिंप्रडवाडी सह इतरही खेडेगावांत वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याने तेथील नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

झरी तालुक्याच्या ठिकाणी व मुकूटबन शहरा सह इतरही खेडेगावांचा वीज पुरवठा वारंवार खंडित होत असल्याने नागरिक हैराण होत असल्याचे चित्र आहे. दरवर्षी पावसाळा सुरू होताच वीजेचा लपंडाव सुरू होतो. परंतु महावितरण कंपनी तर्फे यावर आवश्यक उपाय केले जाते नाही. परिणामी वीजेवरच पाणी पुरवठा अवलंबून असल्याने ठराविक वेळेत घरगुती पाणी पुरवठा होत नाही. यंदा एक ज्युन पासून पाऊस सुरू झाला. त्यामुळे बर्याच प्रमाणात शेतातील लावणी पेरणीची कामे आटोपली आहे. अशात पाऊस पडतो, त्यामुळे हरकत नाही. पण जर का पावसाने दडी मारल्यास वीजपुरवठा सुरळीत पाहीजेत. ज्यांच्या कडे शेतात सिंचनाची सोय आहे. त्या शेतकरी बांधवांना याच कालावधीत सिंचनासाठी वीजपुरवठा सुरळीत पाहीजेत. त्याचप्रमाणे अनेक कार्यालयातील कागदोपत्री कामे करताना मध्येच वीजपुरवठा खंडित होत असल्याने अडथळे निर्माण होत आहे. त्यामुळे अत्यावश्यक विजपुरवठा सुरळीत करण्यात यावे असे वीज ग्राहकांना वाटते. परंतु येथील महावितरण कंपनीतील वीज सेवक कर्मचारी वीजपुरवठा सुरळीत करण्यात वेळोवेळी अपयशी ठरत असल्याचे स्पष्ट चित्र आहे.

# माहिती अधिकारात मागितली माहिती, न देणे पडणार महागात...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२४, वर्धा :** निलेश केवट, पुणे यांनी सरकारी कामगार अधिकारी कार्यालय वर्धा जिल्हा. यांच्याकडे ३ महिन्यात माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माहिती अधिकार अर्ज टोटल ८ दाखल केले होते. माहिती अधिकार नियमावलीनुसार ३० दिवसाच्या आत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करून दिलेली नसल्यामुळे श्री.केवट यांनी प्रथम अपील अधिकारी यांच्याकडे ७ अपील दाखल केले होते.

परंतु प्रथम अपील अधिकारी यांनी नियमावलीनुसार ३० ते ४५ दिवसाच्या आत एक ही सुनावणी घेतली नसून श्री. केवट यांना माहिती पासून वंचित ठेवले. माहिती अधिकारातील अर्ज करून मागणी केलेली माहिती देणे जर माहिती अधिकाऱ्यांनी टाळले असल्यामुळे श्री. केवट यांनी संबंधित पोलीस स्टेशन, वर्धा शहर यांचेकडे दि.२३/०६/२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांचे वरील गुन्हा दाखल करण्याची तक्रार दिली आहे. तसेच अपील अधिकारी यांनी कायदेशीर बाबींचा अभ्यास करून आदेश दिले नाही, अपील सुनावणी घेतली नाही तर त्यांच्यावर देखील गुन्हा दाखल करण्याकरिता तक्रार दिली आहे. जन माहिती अधिकारी हे वारंवार माहिती न देण्यासाठी वेगवेगळी कारण देतात.

परंतु आता अशी काहीही कारण चालणार नसून माहिती जर दिली नाही तर डायरेक्ट गुन्हा दाखल होणार आहे. त्यामुळे संबंधित पोलीस स्टेशन यांच्याकडे गुन्हा दाखल करण्याकरिता कलम १८८ लोकसेवकांनी रीतसर जारी केलेल्या आदेशाचे पालन न करणे.कलम १७५ लोकसेवकाने दस्तावेज हजर करण्यास बंधनकारक असताना देखील ते हजर न करणे व टाळणे, कलम १७६ लोकसेवकांनी माहिती न देणे, कलम २१७ लोकसेवकाने एखाद्या व्यक्तीला




शिक्षेपासून किंवा मालमत्तेच्या जप्तीपासून वाचवणे वरिष्ठांचे आदेश न मानणे. न्यायालयाचा आव्हान करणे, असे अजून दोन कलमाने गुन्हा दाखल होणार आहे. या सर्व कायद्याचे व हायकोर्टाच्या निर्णयाची माहिती अधिकार कार्यकर्त्यांनी स्वागत केले आहे. असे काही गुन्हे वर्धा शहरात सरकारी कामगार अधिकारी, कामगार कार्यालय यांच्याविरुद्ध कलम १७६, कलम २१७, कलम १९९, कलम २१४ नुसार वर्धा शहरात गुन्हा दाखल करण्याची तक्रार देण्यात आली आहे.

या प्रकरणात माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे कार्यकर्ते निलेश केवट, मनोज सापेकर, शेख नसीर शेख, यांनी तक्रार दाखल केली आहे. लोकसेवक अथवा शासकीय कर्मचारी आपल्या प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष कृतीने गुन्हा करत असेल. कायदेशीर बाबींचे पालन करत नसेल. न्यायालयीन प्रक्रियेचा आदर करत नसेल. बनावट कागदपत्र करत असेल.

गैरव्यवहार पासून वाचण्यासाठी कायद्याचा आधार घेत असेल. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे आदेश मानत गुन्हेगारांना वाचवण्यासाठी खोटे अहवाल बनवत असेल. फसवणूक अथवा बोगस बनवून कागदपत्र तयार करत असेल अशा अपराधांना फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १९७ संरक्षण मिळणार नाही याबाबत दिल्ली हायकोर्टाने आदेश दिले आहे.

## जिल्हा परिषदेच्या माध्यमातून कामे राबवावीत : मंत्री गोरे



**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२४, ठाणे :** जिल्हा परिषदेंवरती लोकांचा विश्वास कायम राहण्यासाठी यापुढे ग्रामविकास विभागाकडून मंजूर होणारी कामे सार्वजनिक बांधकाम विभागाऐवजी जिल्हा परिषदेच्या माध्यमातून राबवावीत, अश्या स्पष्ट सूचना ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी प्रशासनाला दिल्या. ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन समिती सभागृह येथे केंद्र व राज्य पुरस्कृत विविध विभागांच्या कामाचा आढावा घेण्यासाठी नुकतीच बैठक संपन्न झाली. ग्रामविकास विभागाकडून मंजूर होणारी कामे ही सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावी अशी मागणी अनेकदा होत असे. असे निर्देशनास आले आहे. कारण सार्वजनिक बांधकाम विभागाची देयक पध्दत ही सोपी आहे.तर, जिल्हा परिषदेची देयक पध्दत वेळ घेणारी आहे. त्यामुळे काम करणाऱ्यांचा कल सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सर्वाधिक असतो. परंतू जिल्हा परिषदेतील कामकाजात काही बदल करून ही कार्यप्रणाली कशी सोपी होईल यावर लवकरच निर्णय घेतला जाईल तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाप्रमाणे उच्च दर्जाचे काम जिल्हा परिषदेने करावे यासाठी ज्या सुधारणा करणे अपेक्षित आहे त्या करण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. अशी माहिती मंत्री गोरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. या बैठकीत मुख्यमंत्री १०० दिवसाच्या कार्यक्रमाचा आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर प्रधानमंत्री आवास योजनेच्या पहिल्या टप्प्यात २० लाख घरांची मान्यता देण्याचे काम विक्रमी वेळेत करण्यात आले. तर १० लाख ५० हजार घरांना पहिला हप्ता देण्यात आला. तसेच नव्याने १० लाख घरे मंजूर झाली असून वर्षानुवर्षे घरांची प्रतिक्षा असलेली यादी संपली आहे. असे सांगत ठाणे जिल्ह्यात ती शून्य असल्याचे गोरे यांनी नमूद केले.

# खापरखेडा परिसरात इंडोअर स्टेडियमसाठी प्रयत्न करणार : आ.डॉ.आशिष देशमुख

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२४, नागपूर :** गाव खेड्याम ध्ये खेळणारी लोकप्रिय कबड्डी संपूर्ण देशात व्यवसायिक झाली आहे. प्रो कबड्डी लीगच्या माध्यमातून अनेक खेळाडूंची निलामी करण्यात येते त्यामूळे अधिक कबड्डी या खेळाला महत्व प्राप्त झाले आहे. ग्रामिण भागातील खेळाडू व्यावसायिक दृष्ट्या प्रो कबड्डी लीग स्पर्धेत भाग घ्यावा याद्रष्टिकोणातून राज्याचे महसूल मंत्री व नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १० लाख रुपये किंमतीची प्रो कबड्डी मॅट स्वर्ण भारत क्रिडा मंडळ खापरखेडा यांना उपलब्ध करून दिली आहे. २३ जून सोमवारला वीज केंद्राच्या मनोरंजन सभागृह दोन मध्ये आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.

याप्रसंगी मंचावर भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ राजीव



**प्रो.कबड्डी लीग मॅटचे थाटात लोकार्पण...**

पोतदार, रामराव मोवाडे, रमेश जैन, श्यामराव सरोदे, सरपंच शालिनी चवरे, वंशिका चवरे, प्रशांत जालंदर, राहुल गाढवे आदि उपस्थित होते.

याप्रसंगी आमदार डॉ. आशिष देशमुख यांच्या हस्ते गएए ऍडव्हान्स परीक्षा उत्तीर्ण करणाऱ्या वंशिका चवरे, प्रशिक्षक प्रशांत जालंदर, भाजयुमो जिल्हाध्यक्ष आशिष फुटाने यांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. आशिष देशमुख यांनी खेळाडूंना संबोधित करतांना ग्रामीण भागातील खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर योगदान दिले आहे व्यावसायीक दृष्ट्या प्रो कबड्डी स्पर्धा सुरू झाल्यामूळे कबड्डी सारख्या खेळात अनेकांना आपले करिअर घडवता येईल ग्रामिण भागातील युवा खेळाडूंना योग्य संधी आणि सुविधा मिळाल्यास ते निश्चितच राज्य व देशपातळीवर आपली आपले नाव करतील यात शंका नाही. खापरखेडा परिसरातील खेळाडू उमेश यादव याने आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. ग्रामिण भागात खेळण्याकरिता सोयीसुविधा उपलब्ध नाही त्यामूळे येणाऱ्या काळात सर्व प्रकारचे खेळ खेळण्याच्या दृष्टीकोनातून इंडोअर स्टेडियम तयार करण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी डॉ. राजीव पोतदार यांनी खेळाडूंना भविष्याच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या कार्यक्रम ाचे संचालन मोरेश्वर राठोड तर आभार प्रशांत जालंदर यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विलास महल्ले, अनेस चवरे, नितीन गोस्वामी, विपीन नाईक, राजेश गायकवाड, अभय मिश्रा, योगेश जालंदर, कमलेश भास्कर, सचिन नागरकर, मयूर घागरे, राकेश बर्वे, पंकज मोटघरे, यशवंत दुपारे, फिरोज शेख, सागर कंटाळे, बंटी जिकार, मयूर शास्त्री, मयुर घागरे, प्रतिक मुरकुटे, कुणाल देहारे, मयुर गावंडे, अवि वानखेडे, तुषार कडू, अमोल मेश्राम, यश तराळे, कुणाल मेश्राम आदींनी सहकार्य केले.

## कल्याण - वालधुनी - उल्हासनगर मार्गावरील पुलावर ट्रॅफिकसाठी हाईट बॅरिकेट; नागरिकांना दिलासा



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२४, कल्याण :** कल्याण शहरात वाहतूक कोंडी ही गंभीर समस्या बनली होती. विशेषतः बाईचा पुतळा या ठिकाणी, कल्याण-वालधुनी-उल्हासनगर कडे जाणाऱ्या पुलावर दररोज होणाऱ्या वाहनांच्या गर्दीमुळे नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. अखेर, या समस्येवर तोडगा काढण्यासाठी वाहतूक शाखा व कल्याण डोंबिवली महानगर पालिकेने ठोस पाऊल उचलले असून पुलावर हाईट बॅरिकेट्स बसविण्यात आले आहेत.

गेल्या काही दिवसांपासून या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर ट्रक, मालवाहू आणि उंच वाहनांची ये-जा होत होती. यामुळे चौकात वाहतूक खोळंबत होती आणि अपघाताचा धोका वाढत होता. नागरिक, व्यापारी आणि विद्यार्थ्यांनी वारंवार तक्रारी केल्यानंतर वाहतूक विभागाने या मार्गावर नियंत्रण आणण्यासाठी पुलावर हाईट बॅरिकेट लावण्याचा निर्णय घेतला.

या निर्णयामुळे आता केवळ मर्यादित उंचीची वाहनेच या पुलावरून प्रवास करू शकतील. त्यामुळे जडवाहनांची वाहतूक दुसऱ्या मार्गाने वळवली जाईल आणि या चौकातील ट्रॅफिक कोंडी टळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, बाईचा पुतळा या ठिकाणी वारंवार ट्रॅफिक जाम होत होते. त्यामुळे नागरिक त्रस्त झाले होते. बॅरिकेट बसवल्याम ुळे आता मोठी वाहने या मार्गावरून येणार नाहीत आणि वाहतुकीचा गतीमान प्रवाह सुरळीत राहील.

नागरिक आणि स्थानिक व्यावसायिकांनी या निर्णयाचे स्वागत केले असून, प्रशासनाने वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी उचललेले हे पाऊल सकारात्मक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

# लोकमान्य टिळक कन्या विद्यालयात प्रवेशोत्सव साजरा...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२३, चंद्रपूर :** लोकमान्य टिळक स्मारक मंडळ, चंद्रपूर द्वारा संचालित लोकमान्य टिळक कन्या विद्यालय चंद्रपूर येथे शाळेच्या पहिल्याच दिवशी शाळा प्रवेशोत्सव व नवागतांचे स्वागत या कार्यक्रमाला विद्यार्थीनी व पालकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या बडकेलवार या होत्या तर उपमुख्याध्यापिका अर्चना दुर्गपुरोहीत, पर्यवेक्षिका प्रांजली महादाणी यांची प्रम ुख उपस्थिती होती. सर्वप्रथम विद्येची देवता माता सरस्वतीच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलित तरुन माल्यार्पण करण्यात आले. तदनंतर



नवागतांचे मान्यवरांचे हस्ते गुलाबपुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. तसेच नवप्रवेशित वर्ग ५ वी व ८ वी च्या विद्यार्थिनींना मोफत पाठ्यपुस्तकाचे मान्यवरांचे हस्ते वितरण करण्यात आले.

शाळा प्रवेशोत्सवाचा मुळ उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी/ आवड निर्माण व्हावी, बालकाम ध्ये शाळेप्रती आकर्षण निर्माण करणे आणि पालकांमध्ये जागरुकता वाढविणे हा आहे. १ ली ते ८ वी मध्ये शिकणारे कोणतेही बालक पुस्तकापासून वंचित राहू नये, पाठ्यपुस्तकाअभावी शिक्षणात अडचण येऊ नये, तसेच शाळेतील सर्व दाखलपात्र मुलांची १०० टक्के उपस्थिती टिकविणे व गळतीचे प्रमाण शुन्यावर आणण्यासाठी समग्र शिक्षा अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके योजना सुरु केली आहे. शाळेच्या पहिल्या दिवशी नवीन विद्यार्थिनी रममाण व्हावे, शाळेचे आकर्षण वाटावे याकरीता शालेय परिसर रंगबिरंगी फुगे लावून सजविण्यात आला होता. शाळेच्या मुख्याध्यापिका संध्या बडकेलवार यांनी शाळेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमाची माहिती दिली. तसेच शाळेची शिस्त, शाळेची गुणवत्ता, विविध शिष्यवृत्ती, विविध स्पर्धा परीक्षाविषयीची माहिती यावेळी पालकांना दिली. कार्यक्रमाचे संचालन रेखा गावंडे मॅडम नी केले. तर आभार प्रदर्शन उपमुख्याध्यापिका दुर्गपुरोहीत मॅडम नी केले.

# ठाणे वगळता इतर भागात टोईंग कारवाई सुरू...

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.२४, ठाणे :** टोईंग वाहनाद्वारे दुचाकींवर होणाऱ्या कारवाईचा वाद ठाण्यात पेटला असताना वाहतूक पोलिसांनी ठाणे वगळता मुंब्रा, डोंबिवली, कल्याण, भिवंडी आणि विठ्ठलवाडी भागात टोईंग वाहनाद्वारे कारवाईला सुरूवात केली आहे. टोईंग कारवाई करताना ती बेकायदेशीररित्या होत असल्याचा आरोप झाल्याने मागील सात ते आठ महिन्यांपासून टोईंगद्वारे कारवाया बंद होत्या. ठाणे शहरात टोईंग वाहनाद्वारे होणाऱ्या कारवाईला प्रचंड विरोध झाल्याने ठाणे वाहतूक पोलिसांनी ठाणे वगळता इतर भागात टोईंग वाहनाद्वारे कारवाई सुरू केली



आहे. ठाणे आयुक्तालय क्षेत्रात म्हणजेच, ठाणे ते बदलापूर आणि भिवंडी शहरात रस्त्याकडेला बेकायदेशीरपणे उभ्या केलेल्या दुचाकींवर ठाणे वाहतूक पोलिसांकडून टोईंग वाहनाच्या माध्यमातून कारवाई केली जाते. टोईंग वाहनाच्या कंत्राटदारांकडून अनेकदा नियमबाह्य पद्धतीने वाहने उचलली जातात. त्यामुळे टोईंग वाहनांवर काम करणारे कर्मचारी आणि वाहन चालक यांच्यामध्ये वादाचे प्रसंग उद्भवतात. अनेकदा हे प्रकार शिवीगाळी आणि हाणामारी पर्यंत जात असते. त्यासंदर्भातील चित्रफीत देखील विविध माध्यमांवर प्रसारित आहेत. ठाणे आयुक्तालय क्षेत्रातील टोईंग वाहनांचे करार दरवर्षी केले जातात. आयुक्तालय क्षेत्रा अंतर्गत सुमारे ३० टोईंग वाहने धावत होती. या वाहनांचा टोईंग वाहनांचा करार नोव्हेंबर २०२४ मध्ये संपुष्टात आला होता. ठाणे स्थित अजय जेया यांनी टोईंग वाहनाद्वारे केली जाणारी कारवाई चुकीच्या पद्धतीने असल्याचा आरोप करत पोलीस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली होती. तक्रारीनंतर टोईंग वाहनांद्वारे कारवाई बंद झाली होती. काही दिवसांपूर्वी ठाणे वाहतूक पोलिसांनी टोईंग वाहन पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानंतर पुन्हा एकदा याला काही राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी विरोध दर्शविला.ठाणे वाहतूक पोलिसांसम ोर आंदोलने देखील होत होते. अखेर ठाणे पोलिसांनी ठाणे वगळता मुंब्रा, रेल्वे, डोंबिवली, कल्याण, भिवंडी, विठ्ठलवाडी या भागात टोईंग सुरू केली आहे. त्यामुळे या भागात आता टोईंग व्हॅनद्वारे रस्त्यालगत बेकायदेशीररित्या उभ्या असलेल्या दुचाकी वाहनांवर कारवाई होणार आहे.

# रिव्हर्स धबधबा पर्यटकांना खुणावतोय

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२४, पाटण (सातारा) :** पावसाचे आगार असलेल्या पाटण तालुक्यात सर्वत्र पावसाने चांगलीच सुरवात केली असून यामुळे छोटे मोठे धबधबे वाहू लागले आहेत. मात्र सर्वात वेगळा आपल्या वेगळया वैशिष्ठामुळे अल्पावधीतच प्रसिद्ध झालेल्या पाटण तालुक्यातील सडावाघापुर पठारावरील उलटा धबधब्याचे आकर्षण सर्वांनाच असते. हौशी पर्यटकांची पाऊले आता या धबधब्याकडे वळू लागली आहेत. मात्र काही अतिउत्साही हुल्लडबाज, पर्यटक तरूणांमुळे या ठिकाणाला गालबोट लागत असून यामुळे येथील स्थानिक ग्रामस्थ हैराण झाले आहेत,

सडावाघापूर पठारावर निसर्गाने मुक्तहस्ते नैसर्गिक उधळण केली आहे. धुक्यात हरवलेल्या गगनचुंबी पवनचक्क्या, नागमोडी रस्ता, विस्तीर्ण पठार, दाट धुक्याची दुलई, हिरवागार गवताचा गालिचा, सोसाट्याचा गार वारा, मन व तन चिंब करणारा पाऊस, डोंगर दऱ्यातून फेसाळत येणारे छोटे-मोठे धबधबे, पठारावरून दिसणारे निसर्गाचे विलोभनीय



दृश्य, हिरवाईने नटलेल्या डोंगररांगा, खोलच खोल दरी त्यातून वाऱ्याच्या दाबाने उलटे वर येनारे पाणी त्यातुन तयार झालेला उलटा धबधबा (रिव्हर्स पॉईंट ) असे प्रसन्न करणारे नैसर्गिक वातावरण प्रत्येकाच्या मनाला सुखद आनंद देते. अशा स्थळाची भुरळ पडली नाही तरच नवलच. दरवर्षी हजारो पर्यटक या ठिकाणी भेट देऊन उलट्या धबधब्याखाली भिजून आनंद लुटतात.

मात्र या निसर्गरम्य पर्यटन स्थळाला आता हुलल्लडबाजांचे ग्रहण लागू पाहत आहे. शांततेचा भंग करत मोठ्याने लावलेली गाड्यांमधील गाणी, त्यावर कपडे काढून थिरकणारी, बऱ्याच वेळा मद्यपान करून बीभत्सपणे नाचणारी तरुणाईमुळे या पर्यटनस्थळाला गालबोट लागत आहे. याचा महिला पर्यटक व कुटुंबांसहित आलेल्यांना त्रास होतो.

भरधाव वेगाने कर्णकर्कश हॉर्न वाजवित दुचाकीवरून ट्रिपल सीट येणे, तसेच रस्त्यात गाड्या लावून नाचणे, वाहतुकीला अडथळा करणे यांशिवाय स्थानिकांना दमदाटी करणे, गुरांकडे जाणाऱ्या मुली व स्त्रियांकडे अश्लील नजरेने पाहणे या चाळ्यांमुळे या मार्गावरील गावे व सडावाघापूर कर पुरते वैतागले आहेत. अशांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी वर्षापासून होत आहे.

त्यासाठी येथे पर्यटन काळात पोलिस केंद्र उभारून बंदोबस्त ठेवावा, अशी मागणी पर्यटक व स्थानिकांतून होत आहे.मात्र हा परिसर पाटण पोलिस स्टेशनच्या हद्दीत येत असल्याने पाटण पोलिसांनी या ठिकाणी पर्यटन काळात बंदोबस्त ठेऊन हुल्लडबाजांना चाप लावणे गरजेचे आहे.

# थोडक्यात

## श्रमजीवी कामगार संघटनेचा नवनिर्वाचित क.डों.म.पा आयुक्तांना इशारा



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२३, कल्याण (ठाणे) :** दिनांक २३ जून २०२५ रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त अभिनव गोयल आणि श्रमजीवी कामगार संघटना कार्याध्यक्ष सुलतानभाई तसेच व संघटनेचे कल्याण युनिटचे कार्यकर्ते यांची बैठक घेण्यात आली. पालिकेच्या घनकचरा विभागातील नवीन ठेकेदार सुमित अल्को पास्ट कंपनीने सफाई कर्मचाऱ्यांची नवीन भरती न करता जुन्या कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य द्यावे. आयुक्त यांना सांगण्यात आले. तशी श्रमजीवी कामगार संघटनेचे श्रमजीवी कामगार संघटनेचे सभासदांची लिस्ट ही देण्यात आली तरी आयुक्तांनी मी ठेकेदाराला सांगून प्रयत्न करतो असे आश्वासन दिले. त्यावेळी श्रमजीवी कामगार संघटनेचे कार्याध्यक्ष सुलतान भाई पटेल यांनी सांगितले की, जर आमच्या सभासदांना कामावर घेतले नाही तर येणाऱ्या २५ तारखेला राज्य सफाई कामगार आयोगाचे स्वागत आम्ही आमच्या पद्धतीने करू आम्ही आमचा हक्काचा लढा कायम पुढे ठेऊ. असे संघटनेचे युनिट प्रमुख तसेच पदाधिकारी अमित साळवे,प्रविण बेटकर, नितीन काळण, सागर सोनावणे, दिनेश तरे, सचिन भाटकर, गौतम सोनावणे, आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# कृषी विज्ञान केंद्रात शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद कार्यक्रम, शेतकरी पुरस्कार वितरण संपन्न

**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२३, केज (बीड) :** दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई व कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) बीड यांच्या संयुक्त विद्यमाने 'शेतकरी शास्त्रज्ञ सुसंवाद' कार्यक्रमाचे आयोजन सोमवार, दिनांक २३ जून २०२५ रोजी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दीनदयाल शोध संस्थान बीड प्रकल्पाचे प्रमुख डॉ.उपेंद्र कुलकर्णी, उद्घाटक म्हणून राज्यसभा खासदार डॉ.अजित गोपछडे प्रमुख मार्गदर्शक उपस्थित होते. मंचावर कृषी हवामानशास्त्र विभागाचे सहयोगी प्राध्यापक डॉ.प्रल्हाद जायभाये, उपविभागीय कृषी अधिकारी अंबाजोगाई राहुल गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या संध्या कुलकर्णी व कृषि विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. वसंत देशमुख यांची उपस्थिती होती.

कृषि विज्ञान केंद्राने निर्मिती केलेल्या 'नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन: वीज कोसळणे' या घडी पत्रिकेचे अनावरण मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आले. ब्युटी पार्लर विषयांमध्ये प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले. तसेच ऑनलाइन मार्केटिंगच्या माध्यमातून आपली उत्पादने विकणाऱ्या कृषी विज्ञान केंद्राच्या संपर्क महिला उद्योजकांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. यावेळी बीड जिल्ह्यातील कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या ११ शेतकऱ्यांचा 'राष्ट्रऋषी नानाजी देशमुख आदर्श शेतकरी पुरस्कार' देऊन सन्मान करण्यात आला. यामध्ये सारिका व यशवंत देशमुख (गाडे पिंपळगाव, परळी), पूजा रोहित हजारे (लोखंडी सावरगाव, अंबाजोगाई), चंद्रशेखर व्यंकटराव कासले (धानोरा खुर्द अंबाजोगाई), शिवराज व छाया फाटे (नित्रुड, माजलगाव), शीला महादेव कुरवडे (कोल्हेवाडी, केज), कल्याणी चंद्रप्रकाश मिटकरी (दौनापूर, परळी) बालाजी बाजीराव तट (आपेगाव, अंबाजोगाई), हनुमंत विश्वनाथ भोसले (औरंगपूर, केज), संतोष गोरखनाथ बादाडे (नित्रुड, माजलगाव), अरविंद सुधाकर आघाव (दौनापूर परळी) व दिपाली सतीश बेंद्रे (युसुफ वडगाव, केज) या शेतकऱ्यांचा समावेश आहे. सन्मानित शेतकऱ्यांनी कृषी यांत्रिकीकरण, प्रक्रिया उद्योग, भूमी सुपोषण, रेशीम उद्योग, मिलेट प्रक्रिया, काटेकोर शेती, कुक्कुटपालन व बहार व्यवस्थापन या विषयात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी त्यांचा गौरव करण्यात आला. खासदार गोपछडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, जिल्ह्यात महिला शेतकरी आदर्श काम करून कर्तृत्व सिद्ध करत आहेत. जिल्ह्यातील महिला शेतकऱ्यांची यशोगाथा सर्वांना सांगणार आहे. कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ तळागाळात जाऊन काम करीत आहेत आणि त्यांच्या प्रयत्नांना यश मिळत आहे. हे सर्व पाहून मनस्वी आनंद झाला आहे. कृषी विज्ञान केंद्र शेतकऱ्यांच्या प्रयत्नांना विकासाची दिशा देण्याचे काम करीत आहे. शेतकरी महिलांच्या उद्योगाला समाजात मान्यता मिळत आहे. कृषी विज्ञान केंद्र, शास्त्रज्ञ व शेतकरी यांनी एकत्र येऊन चिंतन करण्याचा योग या कार्यक्रमामुळे आला असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्रशासन जमिनीच्या आरोग्यासाठी सजग आहे. शासन आणि शेतकरी यांच्यातील सुसंवादाने कृषीच्या विकासाची गती दृढ होत आहे.

प्रत्येक शेतकऱ्याने शेतीला पूरक व्यवसायाची जोड देण्याची गरज आहे. सर्व शेतकरी महिला उद्योगिनींचे यावेळी



त्यांनी अभिनंदन केले. बीड जिल्ह्याने विकासाची दिशा धरली असल्याचे निरीक्षण त्यांनी नोंदविले. देशाच्या पंतप्रधानांना मराठवाड्यासाठी हवामान केंद्र व आयसीआरची शाखा मराठवाड्यात असावी यासाठी मागणी केली होती; त्यापैकी पंतप्रधानांनी तात्काळ एक डॉफ्लर रडार मराठवाड्याला दिले आहे. पुरस्कार प्राप्त महिला शेतकऱ्यांची सहल दिल्लीला काढून देशाचा कारभार कसा चालतो याची माहिती त्यांना देणार असल्याचे त्यांनी सांगितले.प्रमुख मार्गदर्शक डॉ.जायभाये यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, मान्सून आणि पाऊस या भिन्न बाबी आहेत.

भारतात वेधशाळांचे जाळे वाढल्यामुळे वातावरणीय घटकांचा अभ्यास अचूकपणे करणे शक्य होत आहे. हवामान अंदाज पद्धती आणि शेती व्यवस्थापन विषयावर मार्गदर्शन करताना बोलत होते. उपविभागीय कृषी अधिकारी गायकवाड यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कृषी विभागाचा ३० कलमी कार्यक्रम प्रत्येक गावात राबविण्यात येत आहे. अंबाजोगाई विभागातील १७५ गावांचा समावेश नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेत झाला असल्याचे त्यांनी सांगितले. अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. कुलकर्णी यांनी सांगितले की, बीड जिल्ह्यात रेशीम शेती यशस्वी झाली आहे. यामध्ये शेतकऱ्यांनी स्वकष्टाने सुधारणा केल्या आहेत. शेतकरी व शास्त्रज्ञांनी त्यांचे सर्व अनुभव मांडणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सिताफळ भौगोलिक मानांक प्राप्त आहे. त्याचा उल्लेख प्रत्येक पातळीवर केला पाहिजे. पिवळ्या ज्वारीच्या प्रचारासाठी काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. संशोधन संस्थांचे संशोधन शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची आवश्यकता व्यक्त केली. विविध अभियांत्रिकी व वैज्ञानिक संस्थांनी मदत करण्याचे ठरवले आहे. त्यांच्या मदतीमुळे लिंबाचे विविध पदार्थ परळी, अंबाजोगाई व केज यशस्वी झाले आहेत. शेवगा पावडरचे उत्पादन अंबाजोगाई तालुक्यात वाढले आहे. तसेह यावर्षी कुरवडी, पापड यासारख्या पदार्थांची मागणी वाढली आहे. विविध १७ राज्यात वेगवेगळे ५० पदार्थ एक वर्षापासून विकले जात आहेत.

दररोज ८ ते १२ हजार रुपयांच्या ऑर्डर प्राप्त होत आहेत. हवामान बदल वास्तव असल्याने शेतीला पूरक उत्पन्नाची जोड देणे आवश्यक आहे. कृषि विज्ञान केंद्राचे शास्त्रज्ञ सर्व प्रकारचे प्रयत्न करण्यास तयार असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृषीविद्या शास्त्रज्ञ कृष्णा कर्डिले यांनी केले तर आभार गृह विज्ञान शास्त्रज्ञ रोहिणी भरड यांनी व्यक्त केले. कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत गजानन महाराज दिंडीतील वारकऱ्यांची बोरिसावरगाव येथे आरोग्य तपासणी



**अक्षराज : शिवाजी औसेकर**

**दि.२३, केज (बीड) :** शेगाव येथून आषाढी वारी निमित्त विठुरायाच्या दर्शनासाठी पायी निघालेल्या संत गजानन महाराज यांच्या पालखी सोहळ्यातील १७७ वारकऱ्यांची बोरीसावरगाव येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अशोक गवळी यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य विभागाच्या पथकाने आरोग्य तपासणी करुन त्यांच्यावर मोफत उपचार करुन त्यांना औषध, गोळ्यांचे वितरण केले. केज तालुका आरोग्य विभागाकडून आयोजित करण्यात आलेल्या यां तपासणी शिबिरात एकूण १७७ वारकऱ्यांच्या रक्तातील साखरेची पातळी, ब्लड प्रेशर, वजन चेक करून त्यावर योग्य तो औषधोपचार करण्यात आला. यावेळी दिंडी प्रमुखांना आरोग्य किट व वारकऱ्यांची तपासणी करुन त्यांना अषधोपचार करण्यात आले. दिंडी मार्गावर आरोग्यविषयक जनजागृती फलक लावण्यात आले होते. आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.अशोक गवळी, वैद्यकीय अधिकारी डॉक्टर मोमीन, समुदाय अधिकारी डॉ.कावळे, आरोग्य सहाय्यक कैलास वैद्य, शिंदे यांच्यासह आरोग्य सेवकांनी परिश्रम घेतले.

# अखेर श्रमजीवी कामगार संघटनेच्या मागणीला यश

## जुन्या सफाई कामगारांच्या पुनर्नियुक्तीला आयुक्तांचा शब्द




**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२४, कल्याण (ठाणे) :** कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेतील जुन्या कंत्राटी सफाई कामगारांना नवीन ठेकेदारामार्फत पुन्हा कामावर घेण्याच्या श्रमजीवी कामगार संघटनेच्या मागणीला अखेर यश मिळाले आहे. संघटनेचे कार्याध्यक्ष सुलतानभाई पटेल आणि कल्याण युनिटचे कार्यकर्ते यांनी दिनांक २३ जून २०२५ रोजी आयुक्त अभिनव गोयल यांच्यासोबत झालेल्या बैठकीत ही मागणी लावून धरली होती. त्यावर आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत कामगारांच्या पुनर्नियुक्तीचे आश्वासन दिले.

तथापि, या आश्वासनानंतरही नवीन ठेकेदाराकडून जुन्या कामगारांना डावलण्याचे प्रकार सुरू असल्याची तक्रार सुलतानभाई पटेल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना केली. यावेळी त्यांनी, जुन्या कामगारांना नाकारले गेले, तर आम्ही राज्य सफाई कामगार आयोगाचे आमच्या पद्धतीने स्वागत करू, असा स्पष्ट इशारा दिला. या इशाऱ्याची दखल घेत आयुक्तांनी तातडीने अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांच्या दालनात पुन्हा बैठक आयोजित केली. या बैठकीत त्यांनी सांगितले की, ज्यांना कामावरून घरी बसवले आहे त्यांना उद्यापासून लगेच कामावर बोलावले जाईल. शिवाय, नवीन ठेकेदाराकडून जुन्या सफाई कामगारांना आणि वाहनचालकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल, याची अंमलबजावणी सुनिश्चित केली जाईल. अतिरिक्त आयुक्तांनी स्पष्टपणे सांगितले की, श्रमजीवी संघटनेचा एकही सफाई कर्मचारी कामाविना घरी बसणार नाही. संघटनेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कामगारांच्या हक्कांचे रक्षण झाले असून, त्यांच्या पुर्ननियुक्तीचा मार्ग मोकळा झाला आहे.

# रामशेज किल्ल्यावर भर पावसात संवर्धन मोहीम

## जयंत पाटील, खासदार लंकेंसह शेकडो मावळ्यांचा सहभाग




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२३, अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्याचे खासदार निलेश लंके यांच्या नेतृत्वाखाली मावळा या संघटनेतर्फे रामशेज किल्ल्यावर स्वच्छता मोहिम तसेच वृक्षारोपण मोहिम राबविली. पावसाची तमा न बाळगता मावळ्यांनी ही मोहिम यशस्वी केली. हजारो मावळ्यांच्या उपस्थितीत रामशेज किल्ला फुलला होता. नाशिक जिल्ह्यातील दिंडोरी तालुक्यातील आशेवाडी येथील रामशेज किल्ल्यावर या महिन्यातील गड-कोट संवर्धन व स्वच्छता मोहिम नुकतीच राबविण्यात आली. या मोहिमेमध्ये खा.निलेश लंके यांच्यासह राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, दिंडोरीचे खा. भास्कर भगरे, नाशिकचे खासदार राजाभाऊ वाजे, आमदार सुनील भुसारा, औरामा शेटे, दत्तात्रय पाटील, कोंडाजी आव्हाड, उदय सांगळे, नाना पिंगळे, पुरूषोत्तम पिंगळे, डॉ.योगेश गोसावी, पराग भगरे यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक या मोहिमेत सहभागी झाले होते.

सुर्या अकादमीच्या युवकांनीही या मोहिमेत सहभाग नोंदवत स्वच्छता तसेच वृक्षारोपण केले. या मोहिमेअंतर्गत गडावर ५ ते ६ फुट उंचीच्या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. किल्ल्यावर सोलर दिवे, स्वागत कमान, स्वच्छता राखण्यासंदर्भातील सुचना फलक, कचरा कुंड्या, बसण्यासाठी बाके बसविण्यात आले.

मला खात्री आहे की, महाराष्ट्रातील युवा वर्ग या मोहिमेला प्रतिसाद देतोय, खासदार लंके यांचा हा प्रयोग यशस्वी होईल. राष्ट्रवादीचा अध्यक्ष म्हणून मी तसेच खा.भास्कर भगरे यांच्यासह राष्ट्रवादीचे या भागातील सर्व कार्यकर्ते या मोहिमेत हिरीरीने सहभागी झाले आहेत. मोठा पाऊस असतानाही मावळे या मोहिमेत सहभागी झाले आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पाहताना इथली व्यवस्था चांगली आहे. याचा अनुभव आल्याशिवाय राहणार नाही असा विश्वास जयंत पाटील यांनी व्यक्त केला.

# ठाणे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाकडून ऑलिंपिक दिन साजरा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.२३, ठाणे :** क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे व बी.के. बिर्ला महाविद्यालय, कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये दिनांक २३ जून २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक दिवस साजरा करण्यात आला. ऑलिंपिक दिनानिमित्त बी.के. बिर्ला महाविद्यालयामध्ये क्रीडा विषयक प्रश्न मंजूषा, फूटबॉल व हॅंडबॉल खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धांकरिता कल्याण शहरातील विविध शाळा महाविद्यालय यांच्यातर्फे सहभाग नोंदविला गेला. ऑलिंपिक दिनाच्या उद्घाटन प्रसंगी मेजर ध्यानचंद व ऑलिंपिकवीर खाशाबा जाधव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून सुवर्णा बारटक्के, जिल्हा क्रीडा अधिकारी, ठाणे यांनी उपस्थित खेळाडूंना खेळामध्ये अधिकाधिक मेहनत घेऊन नावलौकिक उंचावण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील राहण्यासाठी शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. या स्पर्धांकरिता कल्याण शहरातील विविध शाळा महाविद्यालय यांच्यातर्फे सहभाग नोंदविला गेला.